अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि.११ जानेवारी २०२४ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ९३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## निर्लज्जपणाचा कळस : उध्दव ठाकरे

✔ **मुंबई** : नार्वेकरांच्या निकालावर उद्धव ठाकरे यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.सभापतींचा पक्षांतराचा राजमार्ग काय ते दाखवून दिले आहे. नार्वेकरांनी दोन-तीन पक्ष बदलले आहेत, त्याचाच राजमार्ग दाखवून दिला. न्यायालयाचे निर्देश दिशादर्शक असतात. ते ऐकले गेले पाहिजेत. मात्र नार्वेकर यांनी जो निकाल दिला आहे ते निर्देश पायदळी तुडवले. आमच्या मागे महाशक्ती आहे आम्ही सर्वोच्च न्यायालयालाही जुमानत नाही हेच आजच्या निकालाने दाखवून दिले आहे. त्यांनी अपात्र कुणालाच केले नाही. आमची घटना ग्राह्य धरत नसाल तर आम्हाला अपात्र का केले नाहीत? शिवसेना कुणाची हे महाराष्ट्रातलं लहान मूलही सांगेल. मात्र निर्णय देताना त्यांचा पायाच चुकला आहे. निर्लज्जपणाचा कळस राहुल नार्वेकरांनी गाठला आहे,असे ठाकरे म्हणाले.

आजच्या निर्णयानंतर उद्धव ठाकरे यांनी राहुल नार्वेकरांवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, नार्वेकरांना त्या ठिकाणी कशासाठी बसवण्यात आलं ते आता समोर आलं आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निकाल हे सर्वोच्च असतात, एक परिमान असते. पण नार्वेकरांनी सर्वोच्च न्यायालयाचे नियम धाब्यावर बसवले. त्यांच्या मागे महाशक्ती असल्यामुळे ते सर्वोच्च न्यायालयाच्या वर असल्याचं दाखवून दिलं. शिवसेना कुणाची याचा निर्णय निवडणूक आयोगाचा निर्णय चुकीचा आहे. त्यावर सर्वोच्च न्यायालयात लढाई सुरू आहे.

# एकनाथ शिंदेच ढाण्यावाघ



## ४० शिलेदारांची ताकत मुख्यमंत्र्यांच्या पाठिशी

# ठाकरेशाही संपुष्टात



## अपात्रतेची उद्धव ठाकरे यांची मागणी राहुल नार्वेकरांनी फेटाळली

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**केवळ महाराष्ट्रच नव्हेतर संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या राज्यातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटातील १६ आमदारांच्या अपात्रतेवरचा निकाल सभापती राहुल नार्वेकर यांनी बुधवारी जाहीर केला असून खरी शिवसेना शिंदे यांचीच असल्याचा निकाल त्यांनी दिला. या १६ जणांना अपात्र ठरवण्याची ठाकरे गटाची मागणी सभापतींनी फेटाळून लावली आहे. शिवसेना शिंदे यांचीच असल्याने त्या आमदारांना अपात्र ठरवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे निरीक्षण नार्वेकर यांनी नोंदवले आहे. एकूणच हा निकाल पाहाता उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का मानला जात असून शिवसेना त्यांच्या हातून निसटली आहेच शिवाय शिवसेनेवरील ठाकरेशाही संपुष्टात आल्याचे मानले जात आहे. निकाल शिंदे यांच्या बाजूने लागल्यानंतर शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी एक जल्लोष केला तर ठाकरे गटाकडून या निकालाचा निषेध करण्यात आला. या निकालाविरूद्ध कायदेशीर लढाई केली जाईल,असे ठाकरे गटाचे युवा नेते आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. या निकालाने शिंदे यांची मुख्यमंत्रीपदाची खुर्ची शाबूत राहिली असून ठाकरे यांना नशिबाची साथ मिळाली नाही. या निवाड्याने महायुती सरकारच्या सत्तेची खुंटी मजबूत झाली असून आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी भाजपा नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नवी 'चाल' काय असेल,याविषयी राजकीय जाणकारांमध्ये नवी उत्सुकता निर्माण झाली आहे.**

गेल्या काही महिन्यांपासून या प्रकरणावर कायदेतज्ज्ञांकडून घटनेचा खिस पाडला जात होता तर राजकीय पटलावर जर तर ची चर्चा रंगली होती. सभापती राहुल नार्वेकर यांना कोर्टाचे ताशेरे सहन करावे लागले होते तसेच विरोधकांकडून होणाऱ्या टीकेलाही तोंड द्यावे लागले होते. पण अत्यंत शांतपणे त्यांनी हे प्रकरण हाताळले.सर्व बारकाव्यांचा अभ्यास करून निकाला दिला. या निकालाने जर तरच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला. आता ठाकरे गटाकडून कोणती कायदेशीर लढाई केली जाते,हे पहावे लागेल. ठीक पाचच्या सुमारास नार्वेकरांनी निकाल वाचायला सुरूवात केली.सारे राज्याची नजर टीव्हीकडे लागून होती. एकनाथ शिंदे यांचा गटच खरी शिवसेना असल्याचा निकाल नार्वेकरांनी दिल्यानंतर सर्वत्र शिवसेनेचे धनुष्यबाण नाचवत शिंदे समर्थकांनी एकच जल्लोष सुरू केला. पक्ष हा बहुमताच्या आधारे ठरवला जातो आणि बहुमत हे शिंदे गटाकडे आहे, असे नार्वेकर म्हणाले. २१ जून २०२२ रोजी विधीमंडळ सचिवालयाकडे असलेल्या नोंदीनुसार शिंदे गटाकडे बहुमत दिसत आहे. त्यामुळे शिंदे गट हा त्या दिवशी खरा शिवसेना पक्ष असल्याचे दिसून येते. पक्षप्रमुखाचाच निर्णय अंतिम हा ठाकरे गटाचा दावा फेटाळण्यात आला आहे.



▸ **बिच्चारे बचावले :** एकनाथ शिंदे, अब्दुल सत्तार, संदीपान भुमरे, संजय शिरसाट, तानाजी सावंत, यामिनी जाधव, चिमणराव पाटील, भरत गोगावले, लता सोनावणे, प्रकाश सुर्वे, बालाजी किणीकर, अनिल बाबर, महेश शिंदे, संजय रायमुलकर, रमेश बोरनारे, बालाजी कल्याणकर

▸ **फक्त मलाच अधिकार :** शिवसेना कुणाची?, याचे उत्तर त्यांच्या पक्ष नेतृत्वाच्या निवड पद्धतीवर अवलंबून आहे. २३ जानेवारी २०१८ रोजी शिवसेनेत अंतर्गत निवडणूक झाली नाही, असे निरीक्षण नार्वेकर यांनी नोंदवले आहे. २१ जून २०२२ रोजी शिवसेनेत दोन गट पडले. शिवसेनेत दोन गट पडल्याचे २२ जून रोजी लक्षात आले. नेतृत्वाची रचना तपासण्यापुरताच पक्षघटनेचा आधार असून खरी शिवसेना कुणाची हे ठरवण्याचा अधिकार फक्त मलाच, असे विधानसभा अध्यक्षांनी स्पष्ट केले आहे

शिवसेना पक्षप्रमुख गटनेत्याला असा निर्णय नार्वेकरांनी दिला. देणे हे लोकशाहीला घातक आहे. पक्षप्रमुखाविरोधात बोलू शकणार कार्यकारिणीचा निर्णय अंतिम दिला. शिवसेना पक्षप्रमुख नाहीत. शिवसेना पदावरून हटवू शकत नाहीत, पक्षप्रमुखाला सर्वोच्च अधिकार असे झाले तर पक्षाला कुणीच नाही. शिवसेनेच्या घटनेत राष्ट्रीय आहे,असा निवाडाही त्यांनी कुणालाही पदावरून हटवू शकत नेतृत्वावरील दाव्यां बाबत निवडणूक आयोगाने दिलेला हा निकाल स्पष्ट आहे, असेल्याचे त्यांनी निकालात नमूद केले.

### ▸ काय म्हणाले राहुल नार्वेकर?



▸ शिंदेना पक्षातून हटवण्याचा अधिकार ठाकरेंना नाही. मनात आलं म्हणून कुणालाही काढता येत नाही. ▸ आधीच्या घटनेनुसार ठाकरेंना कोणालाही पदावरून हटवण्याचा अधिकार नाही. पण पक्ष नेतृत्वाचं मत हे पक्षाचं मत असं गृहित धरता येत नाही. ▸ त्यामुळे एकनाथ शिंदेंना हटवण्याचा निर्णय उद्धव ठाकरे घेऊ शकत नाहीत, तो चुकीचा आहे. ▸ शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे मत हे पक्षाचे मत असू शकत नाही. ▸ त्यासाठी राष्ट्रीय कार्यकारिणी सोबत चर्चा करूनच निर्णय घेणे अपेक्षित आहे. ▸ पक्षप्रमुखांचं मत हे अंतिम नाही. त्यामुळे पक्षाच्या घटनेनुसार त्याला एखाद्याला पदावरून काढायचे अधिकार नाहीत. ▸ निवडणूक आयोगाकडे उद्धव ठाकरे गटानं सादर केलेल्या दाव्यातही तफावत आहे ▸ एकीकडे ते सांगतात पक्षाची बैठक सेनाभवनात झाली, तर दुसरीकडे सांगतात तीच बैठक ऑनलाईन झाली होती.त्यामुळे त्यांची कागदपत्र संभ्रम निर्माण करणारी आहेत. ▸ २५ जून २०२२ ला पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाल्याचा दावा. तसंच या बैठकीत ७ निर्णय घेतल्याचा दावा प्रभू आपल्या फिडेव्हीटमध्ये करतात. पण या बैठकीचे कोणतेही मिनिट्स प्रतिज्ञापत्रात जोडलेले नाहीत. शिवसेनेच्या लेटरहेडवर ते निर्णय घेतल्याचं लिहिलंय पण त्याशिवाय त्यावर कुणाच्याही सह्या नाहीत.

## अल्पवयीन तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : आयटीआयमध्ये शिक्षण घेणाऱ्या एका १७ वर्षीय अल्पवयीन तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना विजापूर रोडवरील सुंदरम नगरात आज



बुधवारी दुपारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. सतीश बसप्पा गायकवाड (वय १७ रा. सुंदरम नगर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. दुपारी एक वाजेच्या सुमारास त्याने घरातील छतास असलेल्या पंख्याच्या अँगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत सतीश गायकवाड याच्या पश्चात आई, वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे.तो आयटीआय मध्ये शिकण्यात होता. त्याची आई हॉटेलमधे तर वडील ड्रायव्हर म्हणून काम करतात. सकाळी आई वडील कामाला गेले होते. त्यावेळी तो घरात एकटा होता. दुपारी फोन उचलत नसल्याने त्याची आई शेजारच्यांना संपर्क साधले. तेव्हा त्यांनी खिडकीतून पाहणी केली. तेंव्हा तो गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. दरवाजा उचकटून त्याला त्वरित शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तो उत्तरापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत.

## विडी घरकुल येथे झाडाला गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : जुना विडीघरकुल परिसरातील पोषम्मा मंदिराजवळ असलेल्या पिंपळाच्या झाडाला एका ५३ वर्षीय इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी उघडकीस आली.



हणमंतु नरसय्या फुलपाटी (वय ५३ रा. कुंभारी ता.दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. बुधवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह मंदिराजवळच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यावेळी मयताची ओळख पटली नव्हती. पोलिसांनी अनोळखी इसम म्हणून घटनास्थळाचा पंचनामा केला. आणि मृतदेह शासकिय रुग्णालयात पाठवून दिले होते. दुपारी मयताची ओळख पटली.या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार नवले पुढील तपास करीत आहेत.

## विविध ठिकाणच्या अपघातामधील २ जखमी महिलांचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

करमाळा आणि मोहोळ परिसरात झालेल्या विविध अपघातामधील दोन महिलांचा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी मृत्यू झाल्याची नोंद पोलिसात झाली आहे.




मालन भीमराव ढेरे (वय ४५ रा.सोहाळे ता.मोहोळ) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या ३ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास सावळेश्वर येथे बसची वाट थांबल्या होत्या. त्यावेळी अनोळखी वाहनाच्या धडकेत जखमी झाल्या होत्या. त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले होते. त्या बुधवारी दुपारी मयत झाल्या. तर निंबोरे (ता.करमाळा) येथे दुचाकीच्या अपघातात जखमी झालेल्या शिवगंगा अभिमान वाघमारे (वय ६५) या दुपारी मयत झाल्या. ७ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास त्या दुचाकीच्या पाठीमागे बसून प्रवास करीत होत्या. निंबोरे गावाजवळ दुचाकी घसरल्याने त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना करमाळा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले होते.

## आईच्या कुशीतील बालक रिक्षाखाली सापडून जखमी

✔ सुराज्य/सोलापूर

चालकाने रिक्षाला अर्जंट ब्रेक लावले. त्यावेळी प्रवासी म्हणून बसलेल्या आईच्या कुशीतील ३ वर्षाचा मुलगा बाहेर फेकला गेला. आणि चाकाखाली सापडून जखमी झाला. हा अपघात अक्कलकोट रोडवरील मुस्लिम स्मशानभूमी जवळ बुधवारी दुपारच्या सुमारास घडला.

भविष्य व्यंकटेश अलवाळ (वय ३ वर्षे रा.गेंट्याल चौक,सोलापूर) असे जखमी झालेल्या बालकाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी लक्ष्मी मरगू (मावशी) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले. भविष्य याला कुशीत त्याची आई रुपाभवानी मंदिर येथून घराकडे रिक्षातून निघाल्या होत्या.जडेसाब स्मशानभूमी जवळ समोरच्या वाहनाला चुकवण्यासाठी चालकाने रिक्षाला ब्रेक मारले. त्यावेळी भविष्य हा आईच्या कुशीतून बाहेर कोसळला. रिक्षाचे पाठीमागील चाक पायावरून गेल्याने तो जखमी झाला. अशी नोंद जेलरोड पोलिसात झाली.

## आयपीएल २०२४ चा हंगाम मार्चमध्ये सुरु होणार

✔ **मुंबई** : इंडियन प्रिमिअर लीगच्या १७ व्या हंगामासाठी बीसीसीआयने जोरदार तयारी सुरु केलीये. आयपीएलच्या १७ व्या हंगामासाठी काही आठवड्यांपूर्वीच लिलाव पार पडला होता. त्यामुळे आयपीएल केव्हा सुरु होणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. आयपीएल कधी सुरु होणार हे बीसीसीआयने सांगितले नसले तरीही मार्चमध्ये स्पर्धेला सुरुवात होणार असल्याचे निश्चित मानले जात आहे. दरम्यान, यावर्षीच्या महिला आयपीएलच्या स्पर्धाही मार्चमध्येच होणार आहेत.

आयपीएलचा १७ वा हंगाम २२ मार्चपासून सुरु होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.



मीडिया रिपोर्ट्सनुसार, महिला आयपीएलला फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात सुरुवात होईल. या वर्षी भारतात सार्वत्रिक निवडणुक देखील आहे. आयपीएल आणि निवडणुकांमध्ये अंतर ठेवण्याचा बीसीसीआयचा विचार आहे.

## लहान मुलाच्या भांडणावरून मारहाण; दोघांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : शाळेतील लहान मुलाच्या भांडणातून मुलास केलेल्या मारहाणीचा जाब विचारण्यास गेले असता काठी आणि लोखंडी कड्याने मारहाण करून एकाला जखमी करण्यात आले.

ही घटना मोडनिंब (ता.माढा) येथे मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. महादेव सुभाष घोडके (वय २९ रा. मोडनिंब) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून टेंभूर्णीच्या पोलीसांनी रामा गायकवाड आणि विनोद गायकवाड या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. सोमवारी गावातील शाळेत लहान मुलांचे भांडण झाले होते. त्यावेळी गायकवाड यांनी घोडके यांच्या मुलांना मारहाण केली होती. त्याचा जाब विचारण्यासाठी ते मंगळवारी दुपारी गेले होते. त्यावेळी दोघांनी मिळून त्यांना मारहाण करून धमकी दिली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार जगताप पुढील तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




बाबा, रिचेकिंग करावी लागेल !

| कल्याण |
|---|
| 200-29-577 |

| मुंबई |
|---|
| 235-02-237 |

# आजपासून श्री सिध्दरामेश्वर यात्रेच्या धार्मिक विधीस प्रारंभ

✔ सुराज्य/सोलापूर

**ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांच्या यात्रेच्या धार्मिक कार्यास रूढी - परंपरेप्रमाणे आज ११ जानेवारी पासून सुरुवात होणार असल्याची माहिती मानकरी राजशेकर हिरेहब्बू यांनी हिरेहब्बू वाडा येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.**

सिध्दरामेश्वरांच्या हातातील योगदंड उत्तर कसबा येथील कै. शिवानंद हिरेहब्बू यांच्या वाड्यातून श्री मठपती (स्वामी) हा योगदंड शुक्रवार पेठ येथील कै. रामचंद्रप्पा शेठे यांच्या वाड्यात घेऊन जातात. त्याठिकाणी मानकरी हिरेहब्बू आल्यानंतर त्या योगदंडाची विधिवत पूजा केली जाते. त्यानंतर होमहवन व हिरेहब्बू यांचे शेटे यांचे वारस एड.. मिलिंद थोबडे हे पादपूजा करतात. त्यानंतर प्रसादाचा कार्यक्रम होतो. तेंव्हापासून यात्रेच्या धार्मिक विधीस सुरुवात होते. ही प्रथा गेल्या ९०० वर्षांपासून आजतागायत रूढी परंपरेने चालत आलेली आहे. १२ जानेवारी रोजी रात्री १२.५ मि. कै. शिवानंद हिरेहब्बू यांच्या वाड्यात मानाच्या पहिली व दुसरी नंदिध्वजास साज चढविण्याचा कार्यक्रम होतो. त्यानंतर हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पूजा होते. तर १३ जानेवारीला सकाळी ८.०० वा. कै. शिवानंद हिरेहब्बू यांच्या वाड्यात पहिल्या व दुसऱ्या नंदिध्वजाची राजशेखर हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पूजा होते. पुजा झाल्यानंतर यात्रेस प्रारंभ होतो व त्यानंतर श्री सिध्देश्वर प्रशालेसमोर कलेक्टर कचेरीच्या जुन्या फाटकाजवळ १ ते ७ काठ्या येऊन उभारल्यानंतर सरकारतर्फे देशमुख हे हिरेहब्बू यांना सरकारी आहेर करतात. हा मान ब्रिटिश काळापासून आजतागायत चालू आहे. तेथून हे नंदिध्वज सिध्देश्वर मंदिरात ६८ लिंगापैकी पहिले लिंग अमृत लिंगाजवळ येऊन थांबतात. त्याठिकाणी सातही नंदिध्वज आल्यानंतर हिरेहब्बू व शेटे तैलाभिषेक घालून त्या लिंगाची विधिवत पूजा करतात. पूजा झाल्यानंतर त्याठिकाणी शेटे यांना हिरेहब्बू हे विडा



देतात व नंतर देशमुख, मसरे, कळके, बहिरोपाटील, भोगडे, थोबडे, सिध्द्रय्या स्वामी, मल्लिनाथ जोडभावी, दर्गो पाटील, शिवशेट्टी, गवसणे, इटाणे (पूजेचे मानकरी, झोळीवाले मानकरी) यांना विडा दिला जातो. हा सर्व विड्यांचा मान हिरेहब्बू देतात. व त्यानंतर ६८ लिंगास यन्नीमज्जन (तैलाभिषेकांस) प्रारंभ होतो. १४ जानेवारी सकाळी ७.०० वा कै. शिवानंद हिरेहब्बू यांच्या वाड्यातून हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पूजा होऊन मिरवणुकीने सिध्देश्वर मंदिरात अक्षता सोहळ्यासाठी संमती काट्याजवळ येतात. येथे सातही नंदिध्वज आल्यानंतर श्री सिध्दरामेश्वरांच्या हातातील योगदंडाच्या साक्षीने सुगडी पुजा हिरेहब्बू व देशमुख करतात. त्यानंतर श्री सम्मा शेटे संमती मंगल अष्टक हे हिरेहब्बू यांच्या स्वाधीन करतात, व त्यानंतर हिरेहब्बू व देशमुख या संमतीची विधिवत पुजा करतात हिरेहब्बू हे शेटे यांना विड्याचा मान देतात. त्यानंतर हिरेहब्बू देशमुख व तम्मा शेटे संमती कट्ट्यावर येऊन त्याठिकाणी श्री तम्मा शेटे संमती वाचन करतात. अशाप्रकारे अक्षता सोहळ्याच्या कार्यक्रम पार पडतो. त्यानंतर सातही नंदिध्वज अमृतलिंगाजवळ येतात. त्याठिकाणी हिरेहब्बू व शेटे यांच्या हस्ते अमृत लिंगाची पंचामृत अभिषेक करून विधिवत पुजा होते. त्यानंतर शेटे यांना हिरेहब्बू हे विडा देतात व इतर मानकऱ्यांना विड्याचा मान दिला जातो. १५ जानेवारीला सकाळी ९.०० वा. हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पुजा होऊन मिरवणुकीने संमती कट्ट्याजवळ येऊन थांबतात व तेथे आल्यानंतर प्रथम श्री शिवयोगी सिध्दरामेश्वरांच्या योगदंडास करमुटगी लावून त्या योगदंडास स्नान घालतात व नंतर पालखीतील मूर्तीस करमुटगी लावून स्नान घालतात. १६ जानेवारी शोभेचे दारूकाम. १७ जानेवारी गेल्या ९०० वर्षांपासून ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांच्या यात्रेचा सांगता समारंभ कप्पडकळीने रूढी परंपरेनुसार होते. या पत्रकार परिषदेस राजशेखर हिरेहब्बू, जगदीश हिरेहब्बू, सुदेश देशमुख, राजशेखर बहिरोपाटील, विनोद हिरेहब्बू, मनोज हिरेहब्बू, आदी उपस्थित होते